**B.A.B.ED. SEMESTER (VII) EXAMINATION, JANUARY 2021**
**MARATHI VI**
**KAVYASHASTRA**

**काव्यशास्त्र**

**DURATION:2 HOURS** **TOTAL MARKS:70**

---

**सूचना** १. सर्व प्रश्न सोडविणे बंधनकारक आहे.
२. उजव्या हाताकडील अंक गुण दर्शवितात.
3. प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर सुरु करावे.

---

प्र. १. अ. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (३ x ५ = १५)

१. काव्य लक्षणात कुंतकांनी 'वक्रोक्तीला' का महत्त्व दिले आहे ?
२. 'आत्मविष्कार' या काव्य प्रयोजनाचा परिचय करा.
३. 'प्रतिभा शक्ती वेड्याची बहीण आहे.' असे का म्हणतात ?
४. 'वस्तू ध्वनि' म्हणजे काय?
५. कोलरिज यांनी कोणते काव्य लक्षण सांगितले आहे?

प्र. २. अ. खालीलपैकी **कोणत्याही तीन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (३ x ५ = १५)

१. 'अभ्यास' या काव्य कारणाचे महत्त्व लिहा.
२. 'व्यवहार ज्ञान' या काव्य प्रयोजनाची उपयुक्तता सांगा.
३. भारतीय साहित्यशास्त्रकाराने काव्याला मानवी देहाची उपमा का दिली आहे ?
४. गौणी लक्षणेचे उपप्रकार तिच्या स्वरूपासह लिहा.
५. ध्वनि विचार स्पष्ट करा.

प्र. ३. अ. काव्याची परिपूर्ण व्याख्या करणे का शक्य नाही हे सांगून मम्मट आणि जगन्नाथ यांनी सांगितलेल्या काव्य लक्षणाची चर्चा करा. (१ x १० = १०)

किंवा

प्र. ३. आ. पाश्चात्य साहित्यशास्त्रकारांनी सौंदर्याला अधिक महत्त्व दिले आहे. पाश्चात्य काव्य लक्षणांच्याआधारे स्पष्ट करा.

प्र. ४. अ. मम्मटाची कारिकेची चर्चा करा. (१ x १० = १०)

किंवा

प्र. ४. आ. पाश्चात्य अभ्यासकांनी काव्य लेखनाची कोणती प्रयोजने सांगितली आहेत?

प्र. ५. अ. प्रतिभा शक्तीचे अलौकिकत्व सांगून प्रतिभा शक्तीच्या घटकांची चर्चा करा.
(१ x १०=१०)

किंवा

प्र. ५. आ. काव्य निर्मीतीमागील जनक कारणांची ओळख करा.

प्र. ६. अ. 'व्यजंना' ही शब्दशक्ती कसे कार्य करते ते सांगून तिच्या विविध उपप्रकारांचा सोदाहरण परिचय करा. (१ x १० = १०)

किंवा

प्र. ६. आ. अभिधा शब्दशक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.